# अलबेली



लेखिका : निकिता गांगुर्डे

# ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# अतरंगी

## लेखिका : निकिता गांगुर्डे

# <u>अतरंगी</u>

## लेखिका : निकिता गांगुर्डे

**पत्ता :** काठे लेन, द्वारका, नाशिक ४२२०११

**मो. नं. : +९१ - ७५५९२०३५९७**

**संकेत स्थळ**

**:** https://marathianibarachkahi.blogspot.com

**ई-मेल :** rinagangurde@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रन किंवा इतर रूपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :
www.esahity.com
esahity@gmail.com

**Whatsapp- 9987737237**

**प्रकाशन : २५ जून २०२२**

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध

- आपले वाचून झाल्यावर फॉरवर्ड करू शकता
- हे ई पुस्तक वेबसाईट वर टाकण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अर्पणपत्रिका

माझ्या आयुष्यात मी पाहिलेल्या त्या सर्व अवलिया कलाकारांना ही साहित्य कृती अर्पण

# नमस्कार वाचकांनो,

मी निकिता दादाजी गांगुर्डे, पेशाने एक ‘सिविल इंजिनिअर’असून लेखन कलेत असलेला माझा कल लक्षात घेऊन मी माझे ‘यासी जीवन ऐसे नाव’ हे प्रथम पुस्तक वाचकांपुढे ठेवले. त्याला तुम्ही दिलेला उत्तम प्रतिसाद, याने मला व माझ्या लेखनास एक विशेष महत्व प्राप्त करून दिला त्याबद्दल वाचकांचे मनापासून आभार. अशाच खास वाचक प्रेमींसाठी घेऊन आले आहे माझ्या नवीन पुस्तकाची खमंग मेजवानी ज्याचे नाव आहे ‘अतरंगी’

अंतरंगी म्हणल कि डोळयासमोर निरनिराळया रंगांच्या छटा लेऊन समोर उभा राहतो तो सर्कशीतला सर्वांना खळखळून हसवणारा जोकर. परंतु आपल्या आयुष्यात अगदी लहानपणापासून ते म्हातारपणापर्यंत येणाऱ्या काही खास व विशेष लक्षात राहणाऱ्या आठवणींतील व्यक्ती यांनाही आपण अंतरंगी म्हणूच शकतो. प्रसंगी आपण त्यांच्याकडून काही शिकलो असू, काही वेळा त्यांच्यामुळे हसलो असू, किंवा काहींनी जीवनाचे मर्म त्यांच्या वागण्यातून स्पष्ट केले असेल. अशा त्या जिवंत कलाकृती म्हणजे

अतरंगी. ज्यांच्या अंतकरणातून मनोरंजन, ज्ञान, प्रगल्भता इत्यादींची उधळण करणारे रंग बाहेर पडतात व त्यातून आपल्या जीवनाला एक अवीट गोडी मिळून जाते.

अशा अतरंगी कलाकारांचा विशेष महिमा या पुस्तकातून मी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. प्रत्येक पानावर काहीतरी वेगळ लिहलं असेल या आशेवर जगण म्हणजे आयुष्य आणि यात आलेल्या अशा अतरंगी व्यक्तींना विसरून कसं बर चालेल ?

मी लेखन करण्यास आरंभ केला आणि ते म्हणतात ना, ‘आवड असली कि सवड आपोआप मिळत जाते’ अगदी त्याचप्रमाणे मिळालेल्या वेळेचा सदुपयोग करत जमेल तसे, जमेल तेवढे, लिहित गेले. हे पुस्तक म्हणजे त्याचीच एक परिणीती आहे.

कोणतेही पुस्तक जेव्हा आपण वाचत असतो तेव्हा आपण त्या व्यक्तीला व त्यांच्या विचारांना जाणून घेत असतो.म्हणजेच नवीन पुस्तक ही एका नवीन व्यक्तीला अप्रत्यक्ष्यपणे भेटण्याची संधीच असते आणि मी देखील अशाच अप्रत्यक्ष्यपणे या एका नवीन पुस्तकाच्या माध्यमातून तुम्हाला भेटायला आले आहे.

मी वेगवेगळ्या साहित्यप्रकारातील पुस्तकांच्या मार्फत वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्नशील राहील. परंतु तुमच्या आशीर्वाद आणि प्रतिसादाशिवाय माझे प्रयत्न विफल आहेत त्यामुळे जास्तीत जास्त तुमचे प्रतिसाद माझ्यापर्यंत पोहचवावे.

तर वाचकांनो,

माझ्या आजवरच्या लेखनाला तुम्ही छान प्रतिसाद दिलात व माझ्या या पुढील सर्व लेखनास असाच प्रतिसाद लाबेल अशी खात्री आहे. माझ्या प्रयत्नांतून हे पुस्तक बनले खरे पण आजच्या या 'फास्ट फूड'च्या जमान्यात ही मी बनवलेली 'मनोरंजक व वैचारिक मेजवानी' वाचकांपर्यंत पोहोचवणार कशी,ही एक भ्रांती मनात होतीच.

या माझ्या पुस्तकाच्या माध्यमातून तुमच्यापर्यंत पोहचण्याची ही संधी मला 'ई साहित्य प्रतिष्ठान'ने दिली त्याबद्दल त्यांचे विशेष आभार.

धन्यवाद

या पुस्तकातील सर्व व्यक्ती, पात्र व स्थळ काल्पनिक असून त्याचा वास्तवाशी काहीही संबंध नाही. असल्यास निव्वळ योगायोग समजावा.

# अनुक्रम


१) चहा क्रांती

२) ट्रक आणि त्यावरील कला कुसर

३) अंघोळ महात्म

४) सायकल

५) प्रवासातील सोबती

६) अतरंगी (कविता)

# चहा क्रांती



आमच्याकडे चहा म्हणजे सकाळचे ‘टॉनिक’ समजले जाते. या टोनिकने म्हणे तरतरी येते. आता तरतरी किती येते हे त्या पिणाऱ्या व्यक्तीवर अवलंबून असत असे म्हणणेच श्रेयस्कर ठरेल. काही लोकांना मी दिवसातून दहा – बारा कप चहा अगदी सहज पिताना पाहिलंय आणि एवढा चहा पोटात रिचवून पुन्हा नवउमेदीने घरी आल्यावर म्हणतात,’ अग, ऐकतेस का, जरा फक्कड आल घालून चहा टाक, आज जरा जास्तच थकवा आलाय‘. चहा पिणाऱ्या समाजासाठी चहा पिणे ही एक साधना बनली आहे. एकदा माझ्या पाहण्यात एक अजबच चहा प्रेमी व्यक्ती आली.

आपल्या चहा पिण्याच्या आनंदात कोणाची अडचण नको म्हणून ती व्यक्ती चहाचा आनंद घेण्यासाठी एका अंधाऱ्या खोलीत जाऊन चहा पीत असे. या पद्धतीने चहा पिल्यावर शांतता लाभते असे त्यांना वाटे. अशा व्यक्तीला पाहिल्यावर तर शांततेचा नोबेल हा चहा पिणाऱ्या समाजासाठी देखील आरक्षित असावा अस मनात येऊन गेल. चहा पिण्याच्या सवयीने माणूस ओळखण्याची प्रथा तशी जुनीच आहे. आधुनिक भारतात कितीही संशोधने झाली तरी या चहा नावाच्या पेयाने जी काही क्रांती केली ती कुणीही करू शकलेल नाही. पूवी म्हणे गुळ आणि पाणी दिले जात असे. अर्थातच त्याला एक वैज्ञानिक असे कारण देखील होते. गुळ हा वातशामक आहे व तो पाण्यासोबत घेतल्याने प्रकृती उत्तम राहण्यास मदत होते. मात्र आता चहाचे नवनवीन वर्जन आलेय आणि मग याच चोखंदळ चहाकऱ्यांनी त्यांचा नामकरण विधी अगदी मोडर्न पद्धतीने केला. मग त्यात लेमन टी, ग्रीन टी, बटर टी, इत्यादि आलेच व आणखी पुढे आमची ही पिढी वाढतच राहील हे देखील सांगून गेले. थोडक्यात काय या चहाची वंशावळ वाढतच राहील आणि चहा प्रेमी त्यांचा आस्वाद येणेकेनेप्रकारे घेतच राहतील यात शंकाच नाही.

कोणाच्या घरी आगंतुक म्हणून जाण्याचा प्रसंग आलाच तर लगेच ‘अग, पाहुण्यांसाठी जरा चहा टाक‘ अस सांगण्यात येई मात्र सध्या फारसे कोणाचेच कोणाच्या घरी जाणे - येणे नसल्याने चहा पिण्याचा हा

सार्वजनिक कार्यक्रम आपल्याच घरी वैयक्तिक झालेला आहे. त्यामुळे चहा या पेयाचे स्थान जनमानसात सर्वात अग्रस्थानी पोहचले आहे.

पूर्वी मात्र या चहाची वेगळीच कथा असे, या चहा नामक पेयाचा आस्वाद घेण्यासाठीच जणू आपण दुसऱ्याच्या घरी जाणार आहोत अशी तयारी मंडळी करायचे. मग एका खिशात सिगारेट, तर दुसऱ्या खिशात एखादा छोटा बिस्किटाचा पुडा, शर्टाच्या खिश्यात चहा नंतर लागणारी बडीशेप इत्यादी लवाजमा सोबत घेऊन जणू एखादी मोहीम फत्ते करण्यास निघतात अगदी तश्या अविर्भावात घरातून बाहेर पडायचे. घोड्याला टाच द्यावी त्याप्रमाणे गाडी काढायचे आणि मग त्या युद्धभूमीवर येऊन पोहचायचे म्हणजेच त्या घरी जिथे चहाचा तह होणार असायचा. तिथे कोणालाच कोणाच्या गप्पांमध्ये रस नसायचा उगीच खूप समजल्यासारख करत मध्येच मग अच्छा – अच्छा, हो का, असे वाक्य फेकून वर चेहऱ्यावर उत्साह दाखवावा लागायचा. अर्थातच हा उत्साह चहासाठीच असायचा यात शंकाच नाही. त्यातही बाई जर किचकट असली तर मग चहासाठी सत्याग्रहच करावा लागे. बायकांना चहा तर ठेवावा लागायचाच पण वर ते भांडी धुण्याचे आलेच त्यामुळे मग थोडी आदळ आपट करतच चहा बनायचा. बर त्यातही तो चहा उकळायला लागला कि लगेच बाहेरून आवाज यायचा ,'अग ऐकतेस का , जरा त्यात आल आणि गवतीचहा पण घाल हो', आता या आवाजाने आतील आदळ आपट 'वादळ' बनून गेलेलं

असायचं. असे सर्व घात आघात सहन करत बाहेरच बसून राहावे लागे. आताच येईल , मगच येईल अशा आशाळ भूत नजरेने त्या माजघराच्या दिशेला आता सर्व मंडळींचे डोळे लागलेले, मग हळूच त्या चहाच्या वासामुळे नाकाने कानांना व कानांनी डोळयांना ‘लवकरच चहा येतोय’ असा संकेत मिळे, तोच .... येताना मघाशी झालेल्या आदळ आपटी मध्ये सांडलेल्या साबणाच्या पाण्यावरून घसरल्याने तो चहाचा ट्रे मंडळींच्या पुढ्यात जाऊन पडायचा आणि चहा जमिनीवर तर काही मंडळींच्या अंगावर पडलेला आता मात्र अशा गलितगात्र अवस्थेत, ‘नकोच ती नसती उठाठेव’ असे म्हणून मंडळी घराबाहेर पडायचे व रस्त्यातील एखाद्या चहाच्या टपरीवर जाऊन चहाचा आस्वाद घ्यायचे.

एकदा तर मी एका अंतिम संस्काराच्या ठिकाणी गेले होते. तिथे ज्या व्यक्तीचे निधन झाले होते ती व्यक्ती चहाची एवढी शौकीन होती कि निधन होण्याअगोदरचे काही काळ चमच्याने पाणी पिण्याऐवजी ती व्यक्ती चमच्याने चहाच पित होती. एका अनुभवी व्यक्तीने पुढे येत त्यांना सांगितल, ‘तुम्ही मरणार आहात तेव्हा आता तरी चहा सोडा’ त्यावर ती मरणासन्न व्यक्ती उत्तरली,’अहो काय माहित वर गेल्यावर मिळेल कि नाही, त्यातही देवाकडे चहापत्ती, साखर असेलच असे नाही’ त्यावर मला म्हणावस वाटल ‘आम्ही तुमच्या खिश्यात देऊ ना भरून साखर आणि चहापत्ती, म्हणजे मग

वर गेल्यावर देव आणि तुम्ही सोबतच चहाचा आस्वाद घ्या' पण माझे हे बोलणे मनातच राहिले कारण तोवर त्यांचे देहावसान झाले होते.

आमच्या गावी म्हातारे लोक चहा पीत तेव्हा ते खूप आवाज करून चहा प्यायचे. मला मात्र खूपच गंमत वाटायची. एकदा असच उत्सुकतेपोटी आईला विचारल, 'आई ही लोक एवढी आवाज करून चहा का पिताय?' त्यावर आईने उत्तर दिल, 'त्यांच वय आणि अनुभव आपल्यापेक्षा जास्त आहे त्यामुळे ते हेच आपल्याला त्यांच्या चहा पिण्यातून सांगत असतात.' हे उत्तर ऐकून तर मी हैराणच झाले. 'हे कस काय शक्य आहे?' असा माझ्या अंतर्मनाला प्रश्न पडला.

चहाला काही लोक 'तल्लफ' म्हणतात मग त्यांच्या मते हे पेय मदिरेच्या समान होत असेल कदाचित. परंतु चहाची ही 'तल्लफ' म्हणजे एक व्यसनच हे निश्चित. कोणत्याही गोष्टीची अतिशोक्ती झाली कि ते एक प्रकारचे व्यसनच बनते. मग काही लोकांचा त्यावर असाही प्रश्न असतो मग आम्ही चहा प्यायचाच नाही का? त्यावर मी म्हणेल चहा सोडला तर अतिउत्तम पण ते जर जमतच नसेल तर चहा प्यावा परंतु त्याला एक मर्यादा असावी. मर्यादा असली तर हे व्यसन होणार नाही आणि व्यसन झाले नाही तर तुमची कोणतीही शारीरिक हानी होणार नाही.

बऱ्याच ठिकाणी असे पहावयास मिळते, 'मला ना डायबेटीस आहे तेव्हा चहात साखर नका घालू हं' पण म्हणून असा बिनसाखरेचा चहा

देखील दिवसातून दहा बारा कप चहा सहज रिचवला जातो हे हानिकारकच नाही का?

कोणी आगंतुक घरी आले कि त्यांच्यासोबत किंवा त्यांच्यामुळे आपण चहा पीत असतो. पण मला सांगा एखाद्या घरी दिवसभर जर पाहुणे येणे चालूच असेल तर त्या घरी दिवसभर घरातील व्यक्तींनी चहाच प्यावा का? तुम्हाला ही अतिशोक्ती वाटेल कदाचित परंतु गावी आजही ही परंपरागत पद्धत चालूच आहे. नवीन लग्न होऊन सासरी आलेल्या मुलीला अगदी रूढी परंपरा समजून सांगाव्या तसे घरातील मंडळी सांगत असतात, ‘बर का ग, आमच्याकडे दिवसभर चहाचे पातीले चुलीवरच असते म्हणजेच कोणीही आगंतुक येओत त्यांच्या बरोबर घरातील सर्व लहान मोठ्यांसाठी चहा बनवला जातो. त्यामुळे तुलाही ती परंपरा पुढे चालवावी लागेल.’ अगदी दडपण आल्यागत ती नववधू त्या घरातील मंडळींकडे पाहत असते. तेव्हाच रेडीओवरील गाणे ऐकावयास येते ‘...नववधू प्रिया मी बावरते’ हे गाण्याचे मधुर शब्द कानावर पडत असताना देखील त्या नववधूच्या मनात मात्र ‘... नववधू प्रिया मी चहाचे भांडे आवरते’ हेच चालू होते.

आज सकाळी सकाळी जरा बाहेरून फेरफटका मारून यावा म्हणून अगदी सहजच निघाले. रस्त्याने जात असताना नेहमीसारखीच चहाच्या टपरीवर चहा पिणाऱ्यांची गर्दी दिसू लागली होती. अधून मधून विजेचा झटका लागल्यागत टपरीतून आवाज येत असे ,’ये गरम चाय ये गरम चाय‘,

आता या वाक्याचा तसा शब्दशः अर्थ लावणे जरा कठीणच. तरी माझ्यामते या वाक्याचा अर्थ ‘या आणि गरम चहा प्या’ असाच निघत असावा. थोडक्यात काय कि साध्या सोप्या आपल्या मराठी भाषेचे त्यांनी चहाप्रमाणे वन बाय टू केले.

# <u>ट्रक आणि त्यावरील कला कुसर</u>




आज रविवार, सुट्टी असल्याने काय करावं, याच विचारात इकडून तिकडे घरात येरझारा मारत होते. तेवढ्यात बाहेरून गोंगाटाचे सूर ऐकू

आले, मग जरा आवाजाच्याच दिशेने असलेल्या आमच्या घरातील खिडकीतून बाहेर डोकावून पाहू लागले. तर रस्त्या कडेला एक ट्रक उभा होता व आजूबाजूला थोडी गर्दी देखील दिसत होती. नक्की काय झालंय हे कळणं जरा मुश्कीलच होतं पण मन ते मनच नाही का, ऐकेल थोडीच, उगीच मनात मग नको ते विचार यायला लागले, अपघात तर झाला नसेल ना ? या ट्रकमधून काही अवैधरित्या तस्करी तर केली जात नसेल ना ? नाही तर मग एवढी गर्दी का झाली असेल ? हे न ते, असे सर्व तर्क वितर्क लावत बसण्यापेक्षा आता माझा मोर्चा थेट त्या गोंगाटाच्या ठिकाणी येऊन पोहचला.

तिथे येऊन पोहचल्यानंतर मला दोन परस्पर विरोधी व्यक्तिंतील शाब्दिक चकमक होताना दिसू लागली. त्यातील एक होत्या ढोबळे काकू आणि दुसरा होता त्या विवादात्मक ट्रकचा ड्रायव्हर. ढोबळे काकू म्हणजे आमच्याच अपार्टमेंट मधील एक उत्साही व धांदरट व्यक्तिमत्व. त्यांना नेहमीच क्रांतीचे, बदलाचे तसेच सुधारणा करण्याचे डोहाळे लागलेले असायचे. त्यांच्या या स्वभावामुळे आमच्या आजुबाजूच्या परिसरात त्या विशेष प्रसिद्ध होत्या. कोणाकडेही विशेष अतिथी येणार असतील तर ढोबळे काकूंचा विशेष परिचयचा समारंभ त्यात नेहमीच असायचा. प्रसंग कुठलाही असला तरीही यांची उपस्थिती त्यात ठरलेली असे. अशा या

ढोबळे काकूंची आजची या विवादात्मक  प्रसंगात काय भूमिका आहे हे जाणून घ्यायला मी सुद्धा आतुर झाले होते.

तिथे नेहमीप्रमाणे ढोबळे काकुंचे तीक्ष्ण शब्द अगदी तीराप्रमाणे समोरच्या उमेदवाराचा शिरच्छेद करत होती. ट्रक ड्रायव्हर मात्र अमराठी असल्याने आपला शब्दांचा तीर कसाबसा बाणात रोवून प्रत्यंचा ओढतो न ओढतो तोच समोरून ढोबळे काकूंच्या तीराने तो पुरता घायाळ होत होता. हे असं मराठी – अमराठी शब्दांचे घनघोर युद्ध चालू होतं. त्यात मी गेल्यावर मला या विवादाचा नक्की मुद्दा काय आहे , हे समजून सांगण्यासाठी तिथे अनेक जाणकार उपस्थित होते. त्या उभ्या असलेल्या नक्षीदार व कलाकुसर केलेल्या ट्रकवर जे लिहलं गेलं होतं, तोच हा विवादाचा कळीचा मुद्दा होता. माझी उत्सुकता आता ताणली गेली.आता मी तात्काळ त्या ट्रकच्या पाठीमागे असं नक्की विवादात्मक काय लिहलंय हे पाहण्यासाठी गेले. तिथे लिहलेलं होत ‘हंस मत पगली प्यार हो जायेगा’ हे वाचून माझी अवस्था अगदीच त्या ठिसूळ रव्याच्या लाडवासारखी झाली म्हणजे आपण लाडू खाण्यासाठी तोंड उघडावं आणि तोंडात लाडू टाकणारं तोच....लाडू आपल्या हातातच गतप्राण व्हावा , मग काय आपल्या हातात फक्त तो लाडवाचा चुरा उरावा.... अगदी तशीच माझी ती परिस्थिती ......हे सर्व कसबसं रिचवून मी पुन्हा त्या गर्दीपाशी आले. तिथे त्या मघाच्या

वादविवादाला अगदी उधान आले होते. रस्त्यावरून जाणारे – येणारे लोक कुतूहलाने हा सर्व चाललेला प्रकार पहात होते. या संबंधीचा घटनाक्रम सांगायला जाणकार मंडळीचा पुढाकार होताच. ढोबळे काकूंचा पारा आता चांगलाच वर गेलेला होता. त्या आता त्याला मराठी समजत नसेल हे गृहीत धरून त्याच्याशी त्यांच्याच तोडकं मोडकं हिंदी भाषेतून बोलू लागले, "अरे, तुने क्यू उधर ऐसा लिखा, बरं लिखा तो लिखा, ऐसा अपशब्द क्यू लिखा , कुछ अच्छा लिखनेका, उससे फिर समाजप्रबोधन होता है" यातलं त्या ड्रायव्हरला कितपत समजत होत हे त्या पांडुरंगालाच ठावे. आता तो ट्रक ड्रायव्हर अगदी वैतागलेला सुरात तोंडातला गुटखा चघळत चघळतच काकूंना उत्तर देऊ लागला, "अरे मावसी, मे आपको वही बता रहा हुं, कि ये ट्रक हमरा नही आहे, ये तो हमरे बडे साहब का आहे, समजे कि नही और अगर हमरा होता तो हम अपनी दोनो बीटीया मुन्नी और शन्नो का नाम ही लिखते" हा सामना आता या भाषेच्या विच्छेदनामुळे चांगलाच रंगतदार झाला होता. ढोबळे काकू मात्र काहीही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हत्या त्या पुढे बोलू लागल्या, "वो सब मुझे मत बता, तुने क्यू नही बताया तेरे वूस बॉस को, महाराष्ट्र मे ऐसे नही चलता, अरे हमरे पास लेकी- बाळी होती है उनपर क्या संस्कार होगा कभी सोचा क्या ?" प्रत्येक प्रतीघातानंतर ट्रक ड्रायव्हरची अवस्था अत्यंत दयनीय होत होती. एकतर त्याला ही अशी हिंदी कम मराठी भाषेची समज नव्हती. तरीही तो ढोबळे काकूंच्या प्रश्नांचे

कसेबसे निराकरण करण्याचा प्रयत्न करत होता, पण ढोबळे काकू मात्र त्याचा हा प्रयत्न विफल करण्यात यशस्वी होत होत्या. ट्रक ड्रायव्हर पुढे उत्तरला ,"अरे अम्माजी, आप पहेले ये बताओ, ये संस-कार क्या होती है, देखिये मैने न्यानो कार देखी है, ऑडी कार भी देखी है पर ये संस-कार क्या होता है, क्या ये कार मार्केट मे नयी आई है, तभी मै सोचू ये हमको काहे नही पता" असं बोलून ट्रक ड्रायव्हरने त्याच्या तोंडातील गुटख्याची पिचकारी रस्त्यावर शिंपडली. ढोबळे काकू स्वतः ला या धक्क्यातून कसबसं सावरत त्याला उद्देशून बोलल्या, "संस्कार वही है जो तेरे पास नही है और ये कुछ नया नही बहुतही जुना है, अरे संस्कार वो है जिसपर हमारी पुरी जिन्दगी चलती है" शेवटी अगदी वेठीस येत ढोबळे काकुंना , गाढवापुढे वाचली गीता अन कालचा गोंधळ बरा होता , ही म्हण अगदी यांसारख्या माणसांना पाहूनच लिहली गेली असेल असे वाटून गेलं आणि त्यांच्या गालावर हसू उमटलं.

आता या काकूंच्या बोलण्याने त्या ट्रक ड्रायव्हरला काय अर्थबोध झाला असेल कुणास ठाऊक पण तो त्वेषाने काकूंना उत्तर देण्यासाठी पुढे सरसावला "अरे अम्माजी, हमरे साहब ने नही बताया ना यहा क्या चलता है और क्या नही उसने मुझे सिर्फ यही बताया कि उधर ये ट्रक चलता है और मे ट्रक लेके आ गया" त्यावर ढोबळे काकूंनी लगेच उत्तर दिले, "तेरे उस

बॉस ने बताया और तू चला आया इधर मुह उठाके, अभी मे बोलुंगी कि उधर विहीर मे जाके कुद तो तू कुदेगा क्या ?" या सर्व विवादाचा अंत कसा करावा यावर काही ज्येष्ठ मंडळी पुढे सरसावले. त्यातीलच एक बर्वे आजोबा पुढे येत म्हणतात ,"बरं का, मी काय म्हणतो, यात त्याचं जरा चुकलंच आहे, पण आता वादविवाद करून काय फायदा, आपण जरा या वादाच्या शेवटाकडे जायला हवंय, प्रश्न वादविवादाने सुटत नाहीत उलट वाढतात, या विषयावर विचार विनिमय करून योग्य तो तोडगा काढायला हवाय" या आजोबांच्या म्हणण्याला अखेरीस दोन्ही विरोधी उमेदवारांनी व गर्दीतील काही 'नसती उठाठेव' अशा कार्यकर्त्यांनीही संमती दर्शविली. आता सर्वांचेच लक्ष त्या आजोबांच्या निर्णयाकडे लागले. आजोबांनी सांगितले, "असं करूया, ज्या वाक्याने एवढा वादविवाद झाला त्याला काळा रंग मारून टाकू म्हणजे 'ना रहेगा बांस , ना बजेगी बांसुरी' काय बरोबर ना " त्यावर सर्वांनी एकमताने होकार दिला. वाळीत टाकून दिल्यासारखं त्या ट्रक ड्रायव्हरचा कुठलाही विचार न करता ही सर्व मंडळी त्याला बाजूला सारून दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी पुढे सरसावली सुद्धा. यांची ही लगबग पाहून त्या ट्रक ड्रायव्हरचा चेहराच काळवंडला , त्याला काय करावे ते सुचेना, त्याला त्याच्या ट्रकवर केलेल्या या कलाकुसरीचा असा पश्चाताप करावा लागेल असं कधी स्वप्नात सुद्धा वाटलं नव्हतं, डोक्याला हात लावून तो तेथील घडणारे एकूण एक दृश्य

आपल्या केविलवाण्या नेत्रांनी टिपत होता. ढोबळे काकूंनी स्वः खर्चातून आणलेल्या काळ्या रंगाने त्या विवादात्मक वाक्यावर पट्टे मारण्यात आले. काही हौशी कलाकार या प्रसंगाला आपल्या मोबाईल मध्ये कैद करत होते तर, काही 'कळीचे नारद' या प्रकारातील व्यक्तींचा चमू अजून कुठे काही विवादात्मक लिहलंय का, याचा शोध घेण्यात व्यस्त होते. एकूणच या वातावरणात क्रांतीचे सूर धुमसत होते. सकाळी सकाळी अगदी दिमाखात उभी असलेली ती ट्रक आता मात्र स्वतः चा तोल अगदी कसाबसा सांभाळत आपल्या चालकाला धीर देत केविलवाण्या स्थितीत उभी होती. या सर्व झालेल्या प्रकारातून त्या ट्रक ड्रायव्हरला चांगलीच शिकवण मिळाली. एक ही कि आपल्याला अनोळखी असलेल्या प्रांतात कधीही ट्रक नामक वाहन चालवायचे नाही आणि दुसरी ही कि ट्रक वरची कलाकुसर ही फक्त एक अफवा आहे. त्याचा वास्तवाशी काहीही संबंध नसतो. एखाद्याच्या नशिबाचा भाग असलाच तर त्याला निव्वळ एक अपवाद समजण्यात यावा.

इकडे जमावाने त्याच्या ट्रकचा कायापालट करण्यापेक्षा अगदी 'काळा' पालट केला होता. आता सर्वानुमते हे ठरवलं जात होत कि त्या काळ्या पट्ट्यावर आता काय लिहावे, ढोबळे काकूंनी त्याचं मत सांगितले, "हे पहा, हा व्यक्ती अमराठी असला तरीही भारतीय आहे, तेव्हा आपण

त्याच्याच भाषेत 'मेरा भारत महान' असं वाक्य त्यावर लिहू म्हणजे त्याचा बॉस पण खुश आणि तो पण खुश" मधेच मग आमच्याच अपार्टमेंट मध्ये राहणारी पिंकू म्हणाली, "आजी, आजी, मी ना दोन फुलं काढते कालच शाळेत बाईंनी शिकवली, त्या वाक्याच्या खाली छान दिसेल अगदी" यावर ट्रक ड्रायव्हर वगळता सर्वांनाच हसू फुटले, मग लागलीच ढोबळे काकू म्हणाल्या, "चला चला पटापट हात चालवा, फुलं-पान-पक्षी जे काही असेल ते पटकन काढा आणि चला इथून". ढोबळे काकू अगदी नेटाने नेतृत्व करीत होत्या. अजून काही वेगळे वादविवाद उद्भावण्यापेक्षा येथून निसटनेच श्रेयस्कर असे उमजून ट्रक सह ड्रायव्हर लगेच तिथून निसटले. न भूतो न भविष्यती, पण या प्रकरणाचा शेवट असा कलाकुसरीतुनच झाला. या गोंगाटाचा व माझ्या आजच्या सुट्टीचा असा अंत होईल असं मला स्वप्नात सुद्धा वाटलं नव्हत.

# अंघोळ महात्म




साधारणपणे हिंदू संस्कृती मध्ये मुहूर्तांचे चार प्रमुख प्रकार पडतात त्यात मग पहाटेच्या ब्रह्ममुहूर्तापासून सुरवात होते. मुहूर्त म्हणजे जीवनातील एखादी महत्त्वाची घटना/कृती सुरू करण्यासाठी किंवा करण्यासाठी निवडलेला काळ होय. हिंदू दिनदर्शिकेत मुहुर्त हे काळाच्या मोजमापाचे हिंदू एकक आहे. एक मुहूर्त म्हणजे तो अंदाजे ४८ मिनिटांचा असतो. मुहूर्त हे आपल्या शक्तींना निसर्गाशी सुसंगत करण्याचे आणि आपल्या यशाची शक्यता सुधारण्याचे एक साधन आहे.

यामागील वैज्ञानिक कारण म्हणजे सूर्यमालेतील ग्रहांमधील गुरुत्वीय बलामुळे पृथ्वीवरील सजीव आणि निर्जीव वस्तूंवर बराच फरक पडतो. उदा. चंद्र आणि पृथ्वी यांच्यातील गुरुत्वाकर्षण बलामुळे महासागरात उच्च व निम्न भरती-ओहोटी निर्माण होते. अशा प्रकारे मुहुर्त हे आकाशातील ग्रहांचे एक वैशिष्ट्यपूर्ण संयोजन आहे जे मानवावर अनुकूल परिणाम करतात.

सूर्याच्या किरणांचा जैविक क्रियेवर आणि चंद्राच्या किरणांचा मानसिक प्रक्रियांवर होणारा परिणाम सुस्थापित आहे. लागवड, वाढ, परिपक्वता आणि कापणी यासारखी शेतीची कामे ही सर्व हंगामी बदल आणि सौर किरणोत्सर्गावर अवलंबून असतात.

मुहुर्तांमध्ये सर्वश्रेष्ठ मानला जाणारा ब्रह्ममुहूर्त, या मुहूर्तात आपली पिसे पसरवणाऱ्या त्या मोराप्रमाणे सूर्यदेवता आपली किरणे पसरविते. तो आपला प्रकाश आणि ऊर्जा जगभर पसरवू लागतो. आकाशगंगेमधील प्रकाशकिरणांचा मानवी मेंदूवर प्रभाव पडतो. नवजात सूर्य आकाशभर किरणांच्या रूपात हजारो बाहू पसरवतो, जे प्रकाश-निळे दैवी किरण उत्सर्जित करतात. या किरणांमुळे पेशी आणि मेंदू जिवंत होतो. भगवान सूर्य किंवा सूर्यदेवता देखील जीवनाची देवता आहे. जर माणूस या काळात या

किरणांसह आपल्या इंद्रियांचा समक्रमण करू शकला तर त्याला अचल ऊर्जेने सक्षम केले जाते.

पृथ्वीवरील सजीवांच्या उत्थानासाठी उच्च शक्तीच्या विद्युत व चुंबकीय प्रभाराच्या रूपाने बाहेर पडणाऱ्या तपश्चर्येच्या शक्तीचा प्रसार ऋषीमुनींनी केला. या तासांमध्ये जागे राहिल्यास या शुल्काचा लाभ घेता येणे शक्य आहे. या प्रकाशाच्या किरणांचा मानवी मेंदूवर सकारात्मक परिणाम होतो. ही किरणे हलकी-निळी असतात. मेंदूतील पेशी सक्रिय होतात. या काळात उर्वरित निसर्ग सुखकारक आणि शांत असतो. पाश्चात्त्य विज्ञानानेही सिद्ध केल्याप्रमाणे मन हे विद्युत आणि चुंबकीय प्रभारांना जागृत करण्याचे व त्याचा प्रसार करण्याचे एक शक्तिशाली साधन आहे. हे या काळात ध्यान आणि तपश्चर्या करणार् या व्यक्तीची उन्नती करतात. आपली मने तीक्ष्ण आणि प्रेरित होतात आणि आपले शरीर एका नवीन जीवनशक्तीने भरलेले असते. सांगायचे कारण इतकेच कि, या मुहूर्तात उठणे व स्नानसुशोभित होणे हे अत्यंत पुण्याचे मानले गेलेले आहे.

आमच्या गावी असलेल्या वाड्याला लागून एक जुन्या बांधणीच व कौलारू असं घर होत. ते घर होतं एका म्हातारीचं, नाव होतं, दगडाबाई. नावात कितीही 'दगडा' सारखी कठोरता असली तरी म्हातारी स्वभावाने खूप प्रेमळ व मवाळ अशा या दगडाबाई वयाने तरी साधारण सत्तर –

पंचह्यात्तरीच्या आसपास  असतील, पण तरीही अंगापिंडाने अजूनही तरतरीत अशा होत्या. दगडाबाईंचे पती काही वर्षांपूर्वीच दम्याच्या विकाराने वारले होतात. त्यामुळे त्यांच्या या घरात आता त्या एकट्याच राहत होत्या. अधून मधून कधीतरी त्यांच्याकडे त्यांचा पुतण्या महादू यायचा, एवढचं काय ते त्यांच्याकडे येन जाण असायचं. दगडाबाईला मात्र स्वतःच असं अपत्य सुख नव्हतं, पण म्हणतात ना ‘जो चोच देतो तो दाना सुद्धा देतो’ त्याचप्रमाणे या दगडाबाई सुईण म्हणून त्याचं कार्य अविरतपणे अगदी चोख बजावत होत्या. ‘सुईन’ म्हणजे जी बायकांचे बाळंतपण, नवजात बाळांना अंघोळ घालणे, बाळ व बाळंतीनीचा आहार-विहार, व्यायाम हे सर्व करणारी एक महत्वपूर्ण अशी स्त्री. ‘सुईन’ ही पूर्वापार चालत आलेली प्रथा दगडाबाई अगदी नेटाने पुढे चालवत होत्या. पूर्वी बायकांची बाळंतपण घरीच केले जात तेव्हा ह्या दगडाबाईंना अगदी विशेष महत्व होतं. त्या एक अत्यंत होतकरू व पारंपारिक सुईण होत्या. नवीन जन्माला आलेल्या त्या जीवाला कोणताही त्रास होऊ न देता त्याला अंघोळ घालण्याचे तसेच बाळंतिनीचं स्नानादी सर्व महत्वपूर्वक काम त्या करीत असतं. नवजात अभ्रक देखील त्यांच्या हातात असताना अत्यंत आनंदात असायचं म्हणजे जणू त्याची आणि दगडाबाईंची अगदी जवळची ओळख असेल या पद्धतीने ते त्यांच्याकडे रूळायचे. बाळंतपण अगदी कोणाचही

असो आणि कितीही जोखमीच असो ते दगडाबाईशिवाय पार पडत नसे. याला अपवाद फक्त जनावरांचा होता हे नक्कीच.

नवजात बाळांना कसं काय शांत करायचं हे त्यांना अगदी बरोबर ठाऊक होते. याचबरोबर त्यांना रूढी परंपरांचही देखील विशेष ज्ञान होतं. एकदा असचं आमच्या वाड्यातल्या शोभना काकूंना बऱ्याच प्रयत्नांनी मुलं झालं पण ते रडेचना...आता सर्वांनाच भ्रांती पडली नक्की काय केलं म्हणजे हे बाळ रडेल ? डमरू, ढोल – ताशे, नगाडे अगदी एवढचं नाही तर ताट आणि चमचे सुद्धा वाजवले पण ते बाळ काही रडेना. कोणी म्हणे चिमटे काढा, कोणी म्हणे कानात ओरडा, कोणी म्हणे उलट लटकावून थापटा मारा...वगैरे वगैरे. या जगात काय आहे जे न मागता मिळतं या प्रश्नाचं उत्तर मला आज इथे मिळालं होतं ...अहो ‘सल्ला’ दुसरं काय...

शेवटी दगडाबाईंचा थरथरता व मऊ स्पर्श त्या नवजात जीवाला झाला. त्यांनी हळूच मग त्या जीवाला जवळ घेऊन दोन्ही कान फुंकले. अल्लड वाऱ्याच्या झुळुकीने गवताचे पाते जसे लपलपावे अगदी तशीच त्या बाळाच्या डोळयांच्या पापणीची हलकेच उघडझाप झाली. मग त्यांनी थोडं तेलं गरम केलं आणि त्या बाळाचे पाय, पाठ व अंग चोळले. अर्थातच मग थोड्या वेळाने त्या बाळाचा पुरता तेल्या मारुती झालेला होता हेही त्यात आलेच. लहान सहान सर्वच मंडळी बाहेर जमली होती. दगडाबाई हळूच

मग त्या बाळाच्या कानात पुटपुटली आणि काय चमत्कार....बाळाने एकच टाहो फोडला....त्या त्याच्या रडण्याने आता लहान बालके जल्लोष करू लागली. थोरे मोठे आनंदली. येथे मला जीवनाच्या अजून एका सुप्त तत्वाचा बोध झाला आणि तो म्हणजे आपलं दुखः हे आपणच पचवायला शिकलं पाहिजे. शेवटी आपल्या दुःखाचा भार हा आपल्यालाच वहावा लागणार आहे.

असोत... तर आता इथे सर्वांना एकच गोष्ट काही केल्या उलगडेना. नक्की असं दगडाबाईंनी त्या बाळाच्या कानात काय सांगितलं असेल कि बाळाने लगेच त्यावर टाहो फोडला...? हाच प्रश्न त्यांना सर्वांनी विचारला, त्यावर दगडाबाई सांगू लागल्या, ''त्याचं काय आहे, मी फक्त त्याला एवढचं सांगितलं, बाबा रे, पटकन रडलास तर बरंय नाहीतर ही मंडळी तुझं काय करतील, हे त्या पांडुरंगालाच ठावे...'' या त्यांच्या उत्तरावर सर्वत्र हशा पिकला. सकाळचा ब्रह्म मुहूर्त साधत या बाळाला अंघोळ घालण्यात आली. दगडाबाईनी हलक्या हाताने बाळाला उचलून आपल्या दोन्ही पायांवर झोपवलं व बाळाच्या शाहीस्नानाचा सोहळा सुरु झाला . त्यात मग टाळू भरणं, नाकाला आकार देणं, कानात तेल ओतण, डोळयात अंजन घालण इत्यादी परंपरागत विधी सुद्धा लगोलग आटोपण्यात आले. नंतर ते बाळ हसत हसत झोपी गेले.

# सायकल



प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात जश्या प्रामुख्याने अन्न, वस्त्र, निवारा या गरजा असतात अगदी तशीच 'सायकल'ची गरज देखील महत्वाची आहे. प्रत्येक वयात सायकलचे महत्व व उपयोग वेगवेगळे असतात. जेवढी

सायकल असणे महत्वाचे तेवढेच सायास चालवता येणे हे देखील तितकेच महत्वाचे असते. नुसती सायकल काही घरात धूळ खात पडलेली पहावयास मिळते तर काही घरांतील व्यक्तींना ‘सायकल’ तर चालवता येते पण तिचे असणे नशिबात नसते. मग इतरांच्या सायकल पाहून डोळयांचे पारणे फेडायचे दुसरे काय !

सायकलचे महत्व हे अगदी पूर्वीपासून ते आजतागायत कायम आहे. बरेचदा आपण सायकलविषयी हे अनेकांच्या (विशेतः डॉक्टरांच्या) तोंडून ऐकले असेल, ‘सायकल चालविल्याने पाठीच्या मणक्यांचा व्यायाम होतो तसेच पायांच्या हालचालीने इतर स्नायुंना देखील बळकटी येते... वगैरे वगैरे’ परंतु या सायकल वाहनाचे कौतुक इथेच थांबत नाही तर पुढे जसं जसा काळ बदलला तस तशी सायकलची रूपे देखील बदलली. म्हणजे बघा हं, पूर्वीची सायकल ही विविधरंगी व एकाच साचेबद्ध चौकटीतील असायची परंतु आता, ‘गिअरची सायकल, साधी सायकल, रेसिंग सायकल, मुलांची सायकल, मुलींची सायकल, छोटी सायकल, मोठी सायकल’ इत्यादि अशा प्रकारे सायकलच्या पूर्ण कुटुंबालाच आपल्याला पाहावे लागते आणि आपल्याला साजेशी त्यातून निवडून घ्यावी लागते. मग त्यातच जर कोणी वयस्कर मंडळी सोबत असली कि कानावर काही असे शब्द पडल्याशिवाय राहत नाही, ‘आमच्यावेळी नव्हती हो एवढी थेरं,

मुकाट्याने जे मिळेल ते पदरात पाडून घेतल जायचं, मग अगदी ते काहीही असो, व्यक्ती असो वा वस्तू, म्हणून तेव्हा म्हणत असत पदरी पडल नि पवित्र झाल, एवढे नखरे करायला वेळ नव्हता तेव्हा....' आता मग मध्येच थांबत एक तिरका कटाक्ष मंडळींकडे देखील टाकला जात. यातून सर्वांनाच काय तो 'अर्थबोध' होऊन जायचा. तेव्हा लगेच आजची एकविसाव्या शतकातील पिढी तेथे पुढाकार घेत म्हणायची, 'अहो, तो जुना काळ होता, आता तसं नाही, आधी तर ऑनलाईन बघायची, मग आवडली तर बघायला जायचं आणि तिथे जर प्रत्यक्षात देखील आवडली तरच घरी आणायची.....' अगदी खरंय प्रत्येक गोष्टीस आजमितीस पर्याय उपलब्ध झालेय त्यामुळे असेल कदाचित, पण आजच्या पिढीला हे '......पदरी पडल नि पवित्र झाल' वगैरे नाहीच रुचत मुळी. असोत, मग अशा प्रकारे ही मंडळी विचारांची व अनुभवांची घासाघीस करून काय ती एकदाची सायकल घेऊन बाहेर पडतात. इथे हा विषय थांबत नाही पुढे सायकल शिकण्यासाठी निरनिराळ्या कसरती सुरु होतात यालाच एकत्रितपणे 'सायकल शिकण्याची धडपड' असे म्हणतात. ही सायकल शिकण्याची कला अंगी यावी यासाठी पालक व एकूणच सर्वच मंडळी 'धडपड ' करताना दिसून येतात. 'धडपड' असा उल्लेख यासाठी कि सायकल शिकताना जर गुडघे फुटले नाही तर सायकल शिकण्याला काही अर्थ नसायचा, जेव्हा सायकल शिकताना शिकणाऱ्या व्यक्तीचे गुडघे फुटले तरच

तो खरा 'सायकलस्वार' म्हणून नावारूपाला यायचा. 'सायकल शिकताना फुटलेले गुडघे' ही एक नोबेल पारितोषिक मिळण्याइतपत अभिमास्पद गोष्ट असायची. थोडक्यातच काय कि तेव्हा होणारा हा सायकल शिकण्याचा अविस्मरणीय सोहळा सर्वांचे मनोरंजन करणारा व तितकाच कौतुकास्पद म्हणावा लागेल.

पूर्वी शेताच्या बांधावरून, वळणाच्या रस्त्यावरून सायकल अगदी सुसाट धावत असत. 'गोमू संगतीन माझ्या तू येशील का ?' या अविर्भावात जणू ती सायकल प्रेयसीच्या जागी तर सायकल चालविणारी व्यक्ती ही प्रियकराची भूमिका अगदी चोख बजावायची. पण कधी कधी मात्र अगदी कहर होत असे. जेव्हा सायकलची चेन ऐन रस्त्यात उतरायची, तेव्हा सायकलस्वार केविलवाण्या परिस्थितीत सायकलला विनवणी करत राहायचा, तेव्हा सायकल मात्र लटके मुरडे देऊन 'आरं संगतीनं तुझ्या मी येणार नाही' असं म्हणत जागीच थांबायची, मग येणारे जाणारे रस्त्यावरचा हा सर्व प्रकार पाहत नयनसुख उपभोगायचे. हो - हो, अगदी त्या सलमान, शाहरुखच्या चित्रपटांप्रमाणे,

पहिला दिवस + पहिला शो = हाउसफुल

जेवढी एखाद्या प्रियकराला प्रेयसी प्रिय असते अगदी तेवढीच सायकलस्वाराला त्याची सायकल प्रिय असायची. अशातच धो - धो

बरसणारा पाऊस असला तर मात्र अगदीच दयनीय परिस्थिती असायची. एकदा कि चेन बसवण्याचा प्रयत्न व्यर्थ ठरला कि, अश्रूंच्या सरी डोळयांत दाटत आणि मग झाली एकदाची लागली चेन असं म्हणतो न म्हणतो तोच पुन्हा तिचे घसरणे, हे ‘चढणे – घसरणे’ चालूच राहते आणि मग त्या सायकलस्वाराच्या मनात नकळतच कवी जागृत होई,

“तिला पाऊस आवडतो आणि मला पावसात ती......”

“तिला सरळ रस्ता आवडतो आणि मला खाचखळग्यात ती......”

अशाप्रकारे मजल दरमजल करत घरी सायकलस्वार पोहचतो न पोहचतो तोच घरातील व्यक्ती आपुलकीने विचारायचे, “काय हो, काय झालं ? सायकल तर ठीक आहे ना, तिला काही झालं तर नाही ना ?“ आता तो सायकल स्वार अगदी गलितगात्र अवस्थेत त्या सायकलकडे पहात राहायचा. त्याच्या मनात तेव्हा विचारांचे काहूर उठायचे, माणसाच्या असण्यापेक्षाही हीचे मोल अधिक ठरून जाते तेव्हा मनातून चर्फडणारा हा सायकलस्वार काही केल्या लपायचा नाही. मग मेटाकुटीला येत सायकलस्वार त्वेषाने एक तिरका कटाक्ष बाहेर उभ्या सायकल कडे टाकायचा आणि उत्तरायचा, “तिला काय होणार आहे, जी काही दैना झालीये ती तर माझी झालीये”. तोच यावर जणू ती सायकल मात्र फिदीफिदी

हसत त्या सायकल स्वाराला उत्तर द्यायची, ‘तुलाच ना खूप हौस, मला खाचखळग्यातून घेऊन जाण्याची, मग भोग आपल्या कर्माची फळ’

आजकाल जस नवीन जोडपं हौशीनं ‘बुलेट’ याप्रकारातील दुचाकीवर बसून फोटो काढतात अगदी त्याच पद्धतीने मागे बायकोला बसवून त्याकाळी देखील ऐटीत नवविवाहित जोडपं फोटो काढीत असत. अगदी स्वतः ची नसेल तर मग कुणाकडूनही फोटोसाठी व्याजाने वा उसनी घेऊन हौस भागवली जात. पूर्वी सायकल ही कोणा प्रतिष्ठित व श्रीमंत लोकांच्या घरीच पहावयास मिळे, मात्र नंतर ‘सायकल’ ही गरजेच्या यादीत समाविष्ट झाली आणि मग चित्रच पालटलं. पूर्वीच्या काळी जवळपास अगदी कुठेही जायची वेळ आली कि, बायको सोबत सायकलला देखील सोबत न्यावे लागायचे , जणू ती सायकल ‘चला गडे, मी सुद्धा येणार हं तुमच्यासोबत‘ अशा अविर्भावात नटून - थटून अंगणात किंवा  व्हरांड्यात तोऱ्यात उभी दिसायची. ‘नटून - थटून ‘ असा उल्लेख यासाठी कारण कि , पूर्वीची सायकल ही आजच्या आधुनिक सायकलपेक्षा बरीच वेगळी होती. बैलपोळयाला ज्याप्रमाणे बैलाला ‘झूल’, ‘घुंगरू’, ‘रंगरंगोटी’ आदींनी सजवले जाते त्याचप्रमाणे पूर्वीच्या सायकल सजवल्या जात. त्यात मग सायकलच्या चाकांच्या आऱ्यामध्ये घुंगरू अथवा मणी गुंफले जात तसेच विविध रंग देऊन तिच्या सौंदर्यात आणखीन भर घातली जात. काही

अवलिया कलाकार याही पुढे जाऊन सायकलच्या चाकांच्या फिरण्यांतून निर्माण होणाऱ्या गतीज उर्जेचे रुपांतर विद्युत उर्जेत करून मग त्यावर रात्री सायकलच्या पुढे व मागे लावलेले प्रकाशदिवे चालू होत असत. हा त्यांचा प्रयोग यशस्वी झाला कि गावात व गावाबाहेर देखील या अशा अवलीयांचे विशेष कौतुक होत असत. या यशस्वी प्रयोगाने मग एक वेगळेच वळण घेऊन त्याला लघुव्यवसायाचे मूर्त स्वरूप दिले जाई. ‘येथे लाइटवरची सायकल बनवून दिली जाईल, तसेच रंगरंगोटीही करून दिली जाईल’ या पाटीने मग त्या लघुव्यवसायाचा शुभारंभ होई. मुळात सायकल ही कधीच लाईट वर नसते, झालेला यशस्वी प्रयोग हा ‘सायकलवरच्या लाईटचा’ असा झालेला असतो. थोर शास्त्रज्ञ एडिसन यांना देखील विजेच्या दिव्याचा शोध लावताना एवढा आनंद झाला नसेल तेवढा आनंद अवलीयांच्या चेहऱ्यावर पहावयास मिळे.

आजकालचे सर्कसमध्ये दिसणारे सायकलवरच्या करामती तेव्हा सर्यास रस्त्यावरच पाहायला मिळे आणि तेही अगदी फुकट. ‘फुकट ते पौष्टिक’ ही म्हण कदाचित तेव्हाच अस्तित्वात आली असेल कारण सायकलवरच्या सर्वच करामती म्हणजे अगदी सायकल शिकण्यापासून ते मग नंतर सायकलला सजवणे किंवा तिचा जिर्णोद्धार करणे याचे सर्व प्रात्याक्षिक पहावयास मिळे.

एकूणच काय कि, ही ‘सायकल’ ची कहाणी त्या काळातील तिचे महत्व स्पष्ट करते, परंतु आज काल आलेल्या पेट्रोल – डीझेलच्या वाहनांपुढे हिचे महत्व कुठेतरी कमी होऊन गेलय. निव्वळ पेट्रोल – डीझेल ही खनिजतेल पिणारी वाहने चालविण्याच्या नादात आपण आपल्याला उत्तम आरोग्य व नफा मिळवून देणारी सायकल काळाच्या पडद्याआड नेऊन ठेवलीये. हेच खरं ‘सायकल’ चे आजचे वास्तव.

# प्रवासातील सोबती



भर सकाळच्या प्रहरी नेहमीप्रमाणे आजही मेन रोडवर वर्दळ होती.आता रस्त्यावर इकडून तिकडे जाणारी वाहने ,माणसांचा कोलाहल

सुरु झालेला होता. त्यातच नुकतेच या शहरात पोहचलेले खंडू व तात्या एका ट्रक मध्ये बसून नावल्याच्या पाड्याला जाण्यास निघाले होते. खंडू व तात्यांचा तसा घनिष्ठ संबंध नसला तरी एकमेकांच्या स्वभावाबद्दल व जाणून घेण्यात नेहमीच अग्रेसर असत. त्यातच आता तर प्रवासाचा प्रसंग होता का कुणास ठाऊक पण त्या दोघांना प्रवास अत्यंत आवडे.खंडू तसा शांत व स्वभावाने लाजरा बुजरा, त्याचा पेहराव अगदी गावकऱ्याला शोभेल असा पांढरा सदरा व पायजमा व पायात वहान असा साधा सरळ दिसणारा खंडू.पण त्याच्या दिसण्याने लगेच हरवून जावू नका कारण साधा सरळ दिसत असला तरी तो स्वताचा विचार करून आलेल्या संधीचे पटकन सोने करून घेण्यात मातब्बर होता.आता ते दोघेही प्रवासास निघाले होते कितीही त्रास झाला तरी धक्के बुक्के खात रस्त्यावरून गाडी चालवतच ते निघाले.तोच रस्त्याकडेला त्यांना तीन मुस्लीम बायका दिसल्या .स्त्रीलंपट असलेल्या तात्याने लगेच गाडी थांबवली. पान खाऊन झाल्याने पचकन रस्त्यावर पिचकारी मारली नंतर खंडू कडे पाहत म्हणाला,"आर ईचार कि र त्यांना कुठ जाणार म्हून" त्यावर खंडूची प्रतिक्रिया अगदीच निर्विकार.तो शांतच होता.आता पुन्हा तात्या त्याच्याकडे पाहत म्हणाला ,"व्ह्यर,ईचार ना त्यास्नी,बाया बापड्या हायीत कुठ जातील त्यात लेकरू बी हाय तान्ह ",परंतु त्यावरही खंडूची कोणतीच प्रतिक्रिया आली नाही. आता मात्र तात्या चिडला.त्याचे ओठ तर पान खाऊन लाल झालेलेच होते मात्र आता

रागाने डोळेही लाल झाले होते. शेवटचा पर्याय म्हणून आता त्याने स्वतःच त्या बायकांना विचारायचे ठरवले.तो त्या बायकांकडे पाहत म्हणाला, ’माय, एवढ्या उनात कुठ जायचय, त्यात लेकरू एवढ तान्ह हाय,आसण माझ्या रस्ताला तर सोड्तुया तुम्हास्नी’,त्यावर त्या बायकांची देखील निर्विकार प्रतिक्रिया होती. कोणी काहीच बोलायला तयार नाही. आता तात्याने गाडी काढली. एवढा वेळ शांत असलेला खंडू हसायला लागला. त्यावर तात्या त्वेषाने म्हणू लागला,”वो तो हाल्या बी नही,वो तो डुल्या बी नही ओर तो ओर वो तो कूच बोल्या बी नही” असे बोलून खंडू व तात्या जोरजोराने हसू लागले. अशा तर्हेने आजचा त्यांचा प्रवास सुरु झाला. प्रवास म्हणला कि कुठे तरी निसर्ग आणि माणसांचा विशेष संबंध दिसून येत असतो. या दोघांचही असाच काहीस आहे. देवदार, साग अशा वृक्षांची कापणी करण्यासाठी हे दोघे विशेष प्रचलित होते. त्याचं हे कामच त्यांच उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन होते. आजही इथे नावल्या खोताच्या सांगण्याला मान देऊन ही जोडगोळी इथे आलेली होती.

वळणा वळणावरून ...शेताच्या बांधावरून .....आजूबाजूचे घाट दऱ्या मागे सारत ही स्वारी आता नावल्याच्या पाड्यावर कशी बशी येऊन पोहोचली. ‘गणपत नावळे’ हा तिथला खोत. आल्या आल्या ओसरीतच या दोघांची कसून विचार पूस सुरु झाली, “काय पाव्हन कुठच म्हणायचे

तुम्ही ?" त्यावर धांदरट तात्या लगेच उत्तरला , "आम्ही व्हय , आव शिवगाव ओलांडल कि, खालच्या अंगान सरळ गेल कि, सख्या पाटलाच वावर आणि त्याच्या उजव्या अंगाला जो पाडा लागतुया नव्ह का तोच आमचा 'महादेवाचा पाडा'...." तो अजून पुढ काही बोलणार तोच नावल्याने त्याला मधेच अडवत पुढचा प्रश्न केला. "मंग आता किती दिस हायेती? नाही म्हणजे काही यागळी सोय करता येईल तुमच्यासाठी नाय का ?" मिश्कील हसत नावल्या आपला एक कटाक्ष खंडू कडे टाकतो. परंतु खंडूला काहीही देणघेण नसल्यान तो इकडे तिकडे पाहत  गुणगुणत तिथून पुढे पायवाटेने जाऊ लागला. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे बघत मनातल्या मनात नावल्या खोत बोलला 'हे बेळण काही आपल्या पंगतीच दिसना गड्या ...'

अस्ताला जाणारा सूर्य खूपच मनोहारक दिसत होता. आजूबाजूला नावल्याने लागवड केलेली आंब्याची झाडे, पेरूची बाग, शेवंती आणि मोगऱ्याची झाडे, त्यामुळे तर निसर्गसौंदर्यात आणखीनच भर पडली होती. खंडू तिथलं एकुण एक दृश्य जणू आसुसलेल्या नजरेने टिपत होता. मोगऱ्याच्या त्या सुगंधाने तर वातावरणात परिमळ दरवळला होता. आता खंडू इथल्या वातावरणात पुरता रुळला होता. इकडे तात्याच्या डोक्यात काहीतरी वेगळच शिजत होत. आलोय पाड्यावर तर एकदा मोहाची

पिऊनच पाहू..... अशा या न त्या प्रकारचे विचार त्याच्या मनात थैमान घालू लागले. तेवढ्यात नावल्या तिथे आला त्याला पाहून बोलला, “काय पाव्हन येणार का? चाललुया मोगरा तोडायला येणार का ?” त्यावर गालातल्या गालात हसत तात्या मिशीला ताव देत बोलला, “बाईनी बोलावलेलं दिसतंय .....नाय म्हणजे हा बी शौक हाय तर .....” त्यावर नावल्या तात्काळ उत्तरला, “नाय ओ नाय ......लगीन झालय आमच आणि तो तसला शौक नाय बर ....हे मोगऱ्याचे फुल घेऊन म्या गजरा बनवतुया आणि नंतर ते समदे पाड्यावर इकतोया” हे ऐकून तात्या जागीच गार पडला. पुढे त्याने नावल्याला जाण्याचा इशारा केला त्यावर नावल्याने मानेनच होकार कळवला. तोच दुरून त्याला खंडू येताना दिसला, पायातल्या चपला हातात घेतलेल्या आणि डोक्याच उपरण मानेभोवती गुंडाळून हलक्या पावलाने गुणगुणत त्याच्या दिशेने येत होता. “आर असा काय पाहतुया? भूत पाहल्यागत...त्या परीस माले भूक लागलीया तवा खोत ले जाऊन ईचार .....पोटापाण्याच काय म्हून...” त्यावर तात्या संथपणे बोलला, ”आता आलासा हुडकून समदा पाडा...कुठ काय हाय .....कुठ काय नाय ....समद पाहून आता आलासा व्हाय रं....आता खोत येईस्तोवर गपगुमान थांब....” हे त्याचे बोलणे ऐकून खंडू पाराच्या दिशेने निघून गेला. हातातल्या चपला जमिनीवर ठेवल्या, आता त्याच उश्याला घेऊन तिथेच झोपी गेला अन थोड्याच वेळात घोरायला सुद्धा लागला. हे पाहिल्यावर

तात्या सुद्धा झोपण्याचा प्रयत्न करू लागला परंतु त्याच्याने ते काही शक्य होईना, अर्थात हे कसे शक्य होईल म्हणा कारण तात्याला गाड्यांच्या आवाजाशिवाय झोप लागण केवळ अशक्य आहे. त्यांचा दोघांचा हा प्रवास इथ थांबला नव्हता. थोड्याच वेळात ही दोघे जेवण आटोपून पुढील प्रवासासाठी रवाना झाली. त्यांना तिथून पुढे दमनवाडीच्या खोताकडे देखील जायचे होते. वाटेत लागणारी नागीणची घाटी अतिशय भयानक मानली जात असे. अगदी नागाच्या चालीप्रमाणे नागमोडी वळणाची घाट दोन उंच पर्वतांना भेदून जात होती. झाडी झुडपे इतकी घनदाट कि भर दुपारच्या वेळी सुद्धा तिथे ऊन दिसत नसे. काटा – किर्र शांतता , कुठून तरी हलकेच कानावर येणारा पाण्याच्या झुळूकीचा आवाज आणि जंगली श्वापदांच्या असण्याची चाहूल तिथली गंभीरता अधिक तीव्रतेने स्पष्ट करीत होते. ती नागिणीची घाटी दिवसा एवढी भीषण दिसे , रात्री तिकडून जाण्याच धाडस आजवर तरी कुणी केल्याच ऐकल नव्हतं. आजच्या आज नावल्याच्या पाड्यावरच लाकूड तोडी आटोपून त्यांना दमनवाडीस जावयाचे होते. प्रसंगाची भीषणता लक्षात घेऊन दोघे लगबगीने कामाला लागले. रात्री त्यांना नागीणची घाटी ओलांडायची नव्हती त्यामुळे पाचच्या आत आटोपण्याचा ते जीवाच्या आकांताने प्रयत्न करू लागले. शेवटी काम आटोपलं आणि त्यांचा हिशोब घेऊन ते चालते झाले. नावल्याने मोठ्या प्रेमाने तात्याला मोहाची एक बाटली देऊ केली. तात्याला मोह काही

आवरला गेला नाही. खंडूच्या नकळत दोन तीन घोट घेऊन स्वारी निघाली. दोघांच्या मनाची पुरती घालमेल सुरु झाली. नागिणीची घाटी ओलांडायची म्हणजे एक दिव्यच होत. कोणीही कोणाशी बोलायला तयार नव्हत त्यांच्या गाडीने आता घाटात प्रवेश केला होता. मघाच्या दोन घोट मद्याचा अंमल आता तात्यावर दिसू लागला होता. कसाबसा गाडीचा आणि स्वतःचा तोल सांभाळत तो इतरत्र पाहण्यासाठी धडपडत होता. परंतु त्याचे डोळे पूर्णपणे नशेच्या आहारी गेले होते. त्याच्या डोळयासमोर अंधार दाटला पुढे दोघांना काही समजण्याआधीच गाडीचा तोल जाऊन ते नागिणीच्या घाटीत गतप्राण झाले. पुढे काहीही पाहण्यासाठी ते दोघे उरले नव्हते त्यांचा हा प्रवास आज इथे असा संपला होता. मद्याच्या नशेने आज यांची प्रवासाची नशा ही अशा प्रकारे संपवली.

# अंतरंगी

जशी रंगामध्ये व्हावी सर मिसळ स्वच्छंद भावनांची
अशी ती गोष्ट आहे त्या अवलिया कलाकारांची
धाटणी असेल जरा वेगळी तरीही त्याचे कोणाला काय
अशा त्या कलाकारास नुसतेच अंतरंगी म्हणावे काय

जसे अंतकरणातून उमटावा रंग त्या इंद्रधनुचा
तसाच तरल भावनांवर लगाम त्या स्वभाव गुणांचा
कधी जगण्याचा मर्म ठेवता समस्तांपुढे
जगण्याचा सूर करावा हेच सांगणे आहे खरे

सुंदर विचारांच्या मनाचा आहे तो हिंदोळा
अनेक रंगात न्हाउनी एकच रंग तो माझा वेगळा
मनाच्या गाभाऱ्याला दिसावे स्वप्न नितळ निळे
असेच अतरंगी ते व्यक्तिमत्व वेगळे वेगळे

- **निकिता गांगुर्डे**